।। सा विद्या या विमुक्तये ।।
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड
"ज्ञानतीर्थ" परिसर, विष्णुपुरी, नांदेड - ४३१६०६ (महाराष्ट्र)
SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY NANDED
"Dnyanteerth", Vishnupuri, Nanded - 431606 Maharashtra State (INDIA)
Established on 17th September 1994 – Recognized by the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with 'A' Grade

Phone : (02462) 229574
Extension.No.143, 153

POST GRADUATION SECTION

Website: www.srtmun.ac.in
E-mail: dr.pg.srtmun@gmail.com

संदर्भ:पदव्युत्तर/उन्हाळीसुटी/२०१९.२०/393।  दि. २२/०६/२०२०

विषय: शैक्षणिक वर्ष २०१९—२० करिता उन्हाळी सुटया वाढविणे व शैक्षणिक वर्ष — २०२०—२१ सुरू करणे बाब.

संदर्भ: १. या कार्यालयाचे परिपत्रक कं. पदव्युत्तर/उन्हाळीसुटी/२०१९—२०/३८६५, दि. १३/०६/२०२०

२. मा. शिक्षण सहसंचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य पुणे, यांचे पत्र कं. उशिसं/२०२०/कोरोना/मवि—१, दि. ०२/०६/२०२०

३. महसुल, वन, आपत्ती व्यवस्थापन मदत व पुर्नवसन विभाग महाराष्ट्र शासन यांचे आदेश कं. **DMU/2020/CR-92/Dism-1,** दि. ३१ मे २०२०

४. महसुल, वन, आपत्ती व्यवस्थापन मदत व पुर्नवसन विभाग महाराष्ट्र शासन यांचे आदेश कं. **DMU/2020/CR-92/Dism-1,** दि. ०४ जुन२०२०

५. महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन परिपत्रक कं. संकीर्ण १०२०२०/प्र. कं. ०१/सचिव (व्यय) दि. ०५ जुन २०२०

६. महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग मंत्रालय मुंबई यांचे शासन परिपत्रक कं. समय २०२०/प्रं.कं. ३५/१८ (र.व.का.) दि. ५/०६/२०२०

## परिपत्रक

मा. कुलगुरू महोदयांनी दिलेल्या आदेशानुसार या परिपत्रकाद्वारे मा. प्राचार्य सर्व संलग्नित महाविद्यालये, मा. संचालक सर्व शैक्षणिक संकुले, मा. संचालक उपकेंद्र लातूर, परभणी, किनवट, मा. प्राचार्य न्यु मॉडेल डिग्री कॉलेज, हिंगोली यांना कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०१९—२० करिता उन्हाळी सुटटया दिनांक २५/०६/२०२० पर्यंत वाढविण्यात आलेल्या असुन दि. २६ जुन २०२० पासुन शैक्षणिक वर्ष २०२०—२१ चे कामकाज सुरू होईल तर अभियांत्रिकी, औषधीनिर्माणशास्त्र, विधी महाविद्यालयाचे शैक्षणिक कामकाज दिनांक ०१/०७/२०२० पासुन सुरू होईल असे या विभागाचे परिपत्रक क्र.

शैक्षणिक/पी.जी./२०१९–२०/SPL /३९१९, दि. २०/०६/२०२० अन्वये कळविण्यात आलेले आहे यांची कृपया नोंद घ्यावी, ही विनंती.

आपणास विदीतच आहे की, केंद्र शासन, राज्य शासन व विद्यापीठ अनुदान आयोगाच्या निर्देशानुसार वेळोवेळी निर्गमित परिपत्रकान्वये विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालये, विद्यापीठ संकुले यांना कोरोणा विषाणु प्रसारावर प्रतिबंधात्मक उपाय योजना करण्याबाबत कळविण्यात आले आहे. तसेच परिपत्रकामधील सुचनाचे काटेकोरपणे पालन करण्याचे सुध्दा सुचित करण्यात आले असुन शासनाच्या आदेशानुसार टाळेबंदीचा कालावधी दि. ३० जुन २०२० पर्यत वाढविण्यात आला आहे.

टाळेबंदीच्या कालावधी दरम्यान शिक्षक, संशोधक यांनी मुख्यालय न सोडता वर्क फ्रॅम होम संबंधित विभागाचे कामकाज करावे. विद्यापीठ व संलग्नित महाविद्यालये यांनी शिक्षक संख्येच्या १५ टक्के किंवा १५ या पैकी जे जास्त असेल त्या संख्येच्या प्रमाणात शासन आदेशाचे व शासन निर्णयाचे अवलोकन करून संख्या निर्धारित करावी. तसेच दि. ३० जुन २०२०पर्यत Teaching Learning होणार नाही तथापि परिक्षा विषयक तसेच ईतर शैक्षणिक कामे करावी.

मा. कुलगुरू महोदयाच्या आदेशान्वये सर्व संलग्नित महाविद्यालये प्राचार्य, विद्यापीठ संकुलाचे संचालक, उपकेंद्र संचालक यांनी यांची नोंद घ्यावी व हि बाब सर्व संबंधिताच्या निदर्शनास आनुन देउन त्यानुसार कार्यवाही करावी, ही विनंती.

PAKWWWW

सहा. कुलसचिव
पदव्युत्तर विभाग